# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८ क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१

## जाहीर आवाहन

**सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आरक्षित जागेवर प्रवेश घेवु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जात पडताळणीचे अर्ज दि.३१ मार्च, २०२० पूर्वी दाखल करणेबाबत**

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षेचे ऑनलाईन अर्ज सध्या स्वीकारण्यात येत आहे. आरक्षित जागेवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी नियमानुसार समितीकडे अर्ज केल्यानंतर सामान्यत: ३ महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र देण्यात येते. वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी समितीस पुरेसा अवधी मिळावा तसेच जात वैधता प्रमाणपत्रा अभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून वंचित राहू नये. यास्तव ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनीअद्यापही वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज सादर केलेला नाही त्यांनी ज्या जिल्ह्यातुन जातीचा दाखला प्राप्त केलेला आहे त्या जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी दि. ३१ मार्च, २०२० पुर्वी अर्ज दाखल करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.त्या तारखेनंतर अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहिल.

**कैलास कणसे (भापोसे)**

**महासंचालक, बार्टी, पुणे तथा मुख्यसमन्वयक,**

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य**

**Advt/CVC/03/02/2020/33**